## निराकार-निरंतर

ग्रेसांच्या कवितेसारखं
त्याचं व्यक्त होणं..
कधी गूढ, अनाकलनीय,
कधी मनस्वी, टोकाचं,
पण टोकदार नव्हे!

गंधर्वांच्या निर्गुणीसारखं
त्याचं व्यक्त होणं..
कधी भिडणारं, भावणारं,
कधी गर्दीत एकाकी करणारं,
पण एककल्ली नव्हे!

कबीराच्या एकतारीसारखं
त्याचं व्यक्त होणं..
कधी तादात्म्य पावणारं,
कधी जमीनीवर आणणारं,
पण साथ सोडणारं नव्हे!

तो, त्याचं असणं..
निराकार, निरंतर..

**©प्रीती देशपांडे**